ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 3 | Dec - 2015


Review Of Research

# भावगीत

प्रा.डॉ. चारूशिला राजेश्वर रूमाले
श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.

**सारांश:**

संस्कृत साहित्यामध्ये महाकाव्य, खंडकाव्य, मुक्तककाव्य नाटक, चंपूकाव्य इत्यादींच्या व्याख्या विशद केलेल्या आढळतात. परंतु आज आपण ज्याला भावगीत म्हणतो किंवा गीतिकाव्य याचीच स्पष्ट अशी व्याख्या केलेली आढळत नाही. आधुनिक काळात इंग्रजी पाश्चात्य साहित्याच्या संपर्काने व प्रभावित होऊन गीतांची रचना झाली. मराठीमध्ये भावगीताची पाळेमुळे आपल्याला लोकगीत जानपदगीते, संतकाव्य यातच शोधावी लागतात. पण त्याला आपण भावगीत या संज्ञेने संबोधू असे म्हणता येणार नाही. इंग्रजीच्या प्रभावाने गीतरचना करण्याकरिता प्रभावित झालेले कवि सॉनेट, ओडसटायर, आयेरा, एलिजी इत्यादी इंग्रजी गीतांच्या धर्तीवर गीतांची रचना करू लागले. भावगीतांची परंपरा समृद्ध करण्यामध्ये ना.घ.देशपांडे, बा.भ.बोरकर, भा.रा.तांबे, अनंत काणेटकर, कुसुमाग्रज, राजा बढे, सावळाराम, शांता शेळके, ग.दि.मा. ज्ञानेश्वर, नामदेव, बहिणाबाई, व. बापट, मंगेश पाडगावकर, विंदा, बालकवी, बी, अनिल, मुक्तिबोध, इंदिरा संत इत्यादी कवी येतात.



या शोधनिबंधामध्ये खालील घटका द्वारा भावगीत स्पष्ट करता येईल.

- भावगीताला पर्याय नाव कोणकोणती?
- भावगीत व भावकाव्य यातील भेद कोणकोणते? हे शोधणे.
- भावगीत सादरीकरणाचे घटकांबद्दल माहिती मिळवणे.
- मौलिकता, संगीतात्मकता, संवादात्मकता.
- अनुभूती व अभिन्यक्तीची एकरूपता.
- निसर्ग घटकांचा प्रतिमांचा सहज आधार.
- कलात्मकता, आत्ममग्नता.
- गतीसंवेध, लय.

मराठी, हिंदी साहित्यात गीतिकाव्य किंवा ज्याला आज आपण भावगीत म्हणतो त्याचे व्याख्या व स्वरूप विवेचन इंग्रजीमधील लिरिकल पोयट्री **(Lyrical poetry)** ने पूर्णपणे प्रभावित झालेले आहे. 'लिरिकल पोयट्री' अशी कविता आहे की जी पुराण कालीन युनान मधील 'लायर' नावाच्या तंतू यंत्रावर

गायील्या जात होती व या 'लायर' चा आकार 'विणे' शी मिळता-जुळता होता. म्हणून यावर गायील्या जाणाऱ्या गीतांना तंतुवाद्याची सात असलेली कविता 'वीणाकाव्य' किंवा वैणीक मानल्या जाई.

वसंत दावतारांनी 'गीतकाव्य' या पुस्तकात गीतकाव्य हा शब्द **Lyrec** ला प्रतिशब्द म्हणून योजलेला आहे. **Lyrec** हा 'लायर' या प्राचीन तंतुवाद्य पासून तयार होणारा ग्रीक शब्द या वाद्याच्या साहाय्याने ने गाईले जाणारे पद्य अगर गीत ते 'लिरिक' अशी स्थूलार्थाने व्युत्पत्ती मांडता येते. एकोणिसाव्या शतकात 'लिरिक' हे काव्यप्रकाराचे स्वतंत्र वर्गीकरण मराठीत आले. १९२० पर्यंत हे वर्गीकरण जसेच्या तसे स्वीकारून 'तंतुवाद्याची साथ असलेली कविता' या अर्थाने 'वैणिक' किंवा 'विणाकाव्य' मानले जाई.

काव्य प्रकाराच्या बाह्य आकारावरून, तालघाट व्यक्त करण्याच्या पद्धतीवरून ह्याला 'लघुकाव्य' असाही प्रतिशब्द अस्तित्वात आला होता. कवितेतील स्फुट रचना एकसंघ बंदिस्त अविष्कार लक्षात घेता भावनेचा उद्रेक करणारे काव्य म्हणून भावकाव्य लघुगीत प्रकार सुचवला गेला होता. पण क्षणभर पुढे 'गीतक' हा शब्द प्रा. श्री. नी. चापेकरांनी सुचवला तो 'लिरिक' ला पर्याय होता. तसेच तरंगकाव्य, लहरीकाव्य, कविगीत, गीति, भावगीतिका असे वेगवेगळे नामकरण होत होत शेवटी 'भावगीत' हा शब्द लिरिक ला प्रतिशब्द म्हणून झाला.

## भावगीत व भाव काव्य यातील भेदः

1940 नंतर भाव काव्य अधिकाअधिक लिहिले गेले. ज्यात गायन, वादन, पठण या अंगापेक्षा कवितेची आंतरिक लय अधिक प्रमाण मानली जाते ते भावकाव्य मोठ्याने वाचले जाते किंवा मनातल्या मनातही वाचनाने प्रभावी मुद्रा उमटवू शकते. भावगीत मोठ्याने म्हटले जाते किंवा गुणगुणले जाते. भावगीत या प्रकारात गाणे आहे तर 'भावकाव्य' या प्रकारात 'काव्य' आहे. म्हणजे मुळातच. गाणी आणि कविता असा भेद दिसतो.

- गीतात काव्य असलेच पाहिजे ही गरज नाही. आलाप, आरोह-अवरोह तानांनी आशयानुरूप भर घालून गीत परिपूर्ण होऊ शकते.
- भावगीतात 'गीतभान' असतेच. मात्र भावकाव्य उच्चारणलय असलेले असेल तर त्यात गीतात्मकता नसूनही 'गीतभान' असू शकते.
- भावगीतात उच्चारणाला निश्चित ताल, लय देणारी जातीवृत्ते असतात. भावगीत व भावकाव्यात लय अपेक्षितच असते. ती लय अर्थानुगामी अशय भरीव करणारी असावी लागते.
- भावगीते हे 'कानसेन' समोर ठेवून अवतरलेले असते. भावकाव्य स्वान्तः सुखाय असते. उदा. 'जन पळ म्हणतील हाय हाय'
- भावगीते तत्व, विधान व कवी निवेदनाचा कथनाचा शैलीदार सुंदर विस्तार करते. भावकाव्य हा बंध पाहिला तर त्यात शैलीदार विस्तार नसतोच.
- अनौचित्यामुळे भावगीताच्या आनंदात, आस्वादात कुठेही उणीव येत नाही उलट. भावकाव्यात अशा अनुचिततेला किंवा मांडणीला कुठेही थारा नसतो खरा हाडाचा कवी भावगीतातही शब्दाची किमया करत आशयाला श्रीमंती देतो.

शांता शेळके:-

'असेन मी नसेन मी
परी असेल गीत हे'

उदा. ग.दी. मांडगुळकरांचे कोणतेही भावगीत पहावे एक वेगळीच श्रीमंती त्यांच्या भावगीताला प्राप्त होते.काही भजने, अभंग, भारुडे, भक्तीगीते देखील आपले वेगळेपण राखून भावगीताच्या अंगाने सादर होत असतात. याचे कारण त्यात असणारी गीतपरता!

उदा. वारियाने कुंडल हाले। डोळे मोडीत राधा चाले। (एकनाथ)
हरी पाहुनी भुलली चिंता। राधा घुसळी डेरा रिता।
राधा पाहून भुलले हरी बैल दुभे नंदाघरी।
डेरा रीता मन भिनले से मना। एका भुलला जनार्दना।

- भावगीतात कंठगत स्वरांना न्याय असतो तर भावकवितेत अर्थाला न्याय असतो या दोन्हींचे एकत्र रसायन तयार झाले तर उत्कृष्ट भावगीत तयार होते.

उदा. बा. भ. बोरकरांच्या कविता याच दर्जाच्या आहेत.

तरल मन नराचे राहते ऎकते मी
काटा माझ्या पायी रुतला
शुल तुझ्या उरी कोमल का?
गुलाब माझ्या ह्रदयी फुलला
..................का?

- स्वराना न्याय देणारी शब्दकळा भावगीतात असते म्हणूनच भावगीतात सादरीकरण असते. अगदी लोकगीतातही असते.

उदा. हि अपुर्व मूर्ती सगुण, झाडितसे मम आंगण
हे माझे भाग्य बघून नळफळतील देवते.
वळणावर आंब्याचे झाड एक वाकडे

**भावगीत सादरीकरणाचे घटक:**

**अ)** भावगीत परंपरेत पुर्वापार चालत आलेल्या लोकमान्य असलेल्या प्रिय प्रतिमा वेगवेगळे संदर्भ घेऊन येत राहतात रामसीता,राधाकृष्ण, रूखमादेवीवरू या प्रतिमातर भावगीत एकरूप झाल्या आहेत त्या प्रतिमा मुळे काव्यांतर्गत भव्य स्थिती **Mood** सुचित होत जातो व भाव सुंदरता गतिमान होत जाते.

'राधा गौळण करिते मंथन, अविरत हरिचे मनात चिंतन'।।
'आज गोकुळात रंग खेळतो हरी, राधिके जरा जपून जा तुझ्या घरी'.

**ब)** संवादात्मकता हा घटक अनेक भावगीतातून सादरीकरणाचा भाग म्हणून येतो.
भा.रा. तांबे यांची:

'तुझ्या गळा माझ्या गळा गुंफू मोत्यांच्या माळा
तुझ सगुण म्हणू की निर्गुण सगुणनिर्गुण तूच एक.'

भावगीतात अनेक भाषिक चिन्हांपैकी प्रश्नचिन्हे, विरामचिन्हांनाच स्थान मिळते आणि या चिन्हामुळे आशय सादर होण्यास अधिक चित्रमयता येते.

निवृतिनाथ यांच्या काव्यात (३७६ अभंग उपलब्ध आहेत) मौलिकता संगीतात्मकता याचे दर्शन घडते. संत ज्ञानेश्वर यांच्या रचनेतून भक्तीधाराच प्रवाहित झाली आहे, त्यांनी मराठी भाषेला अमृतापेक्षा ही श्रेष्ठत्व दिले आहे.

"माझ्या मऱ्हाटीची बोलू कवतुके। परी अमृततातेही पैजा जिंके।
ऐसी अक्षरे रसिके मेळवीन।। 'इवलेसे रोप लवियेले द्वारी, तयाचा वेलू गेला गगनावरी'
'मोगरा फुलला मोगरा फुलला, फुले वेचिता बहरूनी कळियासी आला.
मनाचिये गुंती गुंफियेला शेला। बाप रखुमादेवी वरू विठ्ठले अपिर्येला" (२३४)

या अभंगातून ज्ञानेश्वरांनी व्यापकता, आनंदा विभोरावस्था व्यक्त केली ती एखाद्या प्रवाहाप्रमाणे वाहत आहे. त्याचबरोबर त्यांचे आत्मचैतन्य, विश्वचैतन्याशी एकरूप झाले. त्यातून व्यक्त झालेली त्यांची अनुभूती व अभिव्यक्तीची एकरूपता ही एक भावगीताची विशेषता आहे.

विरहिणी मधून ज्ञानेश्वरांची मधुरभक्ती प्रेमाच्या उत्कटतेने व्यक्त झाली. शब्दाची चपलख योजना असून त्यातून विठ्ठलाला भेटण्याची आर्तता व्यक्त झाली. त्याचबरोबर एक संगीत सृष्टी सुद्धा निर्माण झाली ती रचना म्हणजे.

पैल तोगे काऊ कोकताहे । शकुन गे माहे सांगता हे ।।
उड उड रे काऊ तुझे सोन्याने मढवीण पाऊ।
पाहुणे पंढरी राओ घरा कै येती।
दहीभाताची उंडी लावीन तुझे तोंडी।
जीवा पढिये त्याची गोडी सांग वेगी।
उड उड रे काऊ तुझे सोन्याने मढविण पाऊ। (१८८)

कावळ्याद्वारा पाहुणे म्हणून पंढरीराओ घरी येणार असा शुभशकुन मिळालातर दहीभाताची हंडीच तुला देईल इथे ज्ञानेश्वरची तरल प्रेमानुभुति व्यक्त झाली व शब्दगणिक त्यांची भावविवशता वाढत जाऊन शेवटी ती परमोत्कर्षा प्रत पोहोचली, तर काही विचारण्या मधून ज्ञानेशांच्या अनुभूतीची सूक्ष्मता व्यक्त झाली आहे. त्यांचे मन कलात्मकतेने प्रकट झाले. आपल्या प्रियतमाला भेटण्यासाठी व्याकूळ झालेली विरहिणीची सूक्ष्म मनोवस्था क्रियाप्रतिक्रियांद्वारा सूक्ष्म अनुभूती जणू त्यांनी व्यक्त केली आहे. वास्तविक हे त्यांच्या विराट अलौकिक प्रतिभेचे दर्शन आहे.

अवचिता परिमलू झळकला अळूमाळू
मी म्हणे गोपाळे आला गे माये
चाचरति चाचरति बाहेरि निघाले, ठ्कचि ठेले काय करू
मज करा का उपचारु अधिक तापमारू
सखिये शारंगधरू भेटवा की( पृ.१९३ सकल संत गाथा न्यानेशांचे अभंग)

अभंगांमधून रागात्मकथा, कल्पनात्मकता व संक्षिप्तता**,** आर्तता यातून भावगीताचे स्वरूप अतिशय कोमल व हृदयस्पर्शी बनले आहे. विरहिणीपर अभंग हे मराठी काव्यातील, साहित्यातील एक अनुरूप ठेवा आहे.

**क)** एखादी भावस्थिती प्रभावी होण्यासाठी निसर्गातील घटकांचा वर्णन पर किंवा निसर्ग प्रतिमांचा भावगीतात सहज आधार घेतला जातो.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे पक्षी ही सुस्परे आळविती
येणे वरे सुखे एकांताचा वास नाही गुणदोष अंगा येतं.
एथ माझ्या मना होई पक्षीराज मुक्तीचेया काज साधावया
हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणाच्या मखमालीचे
कथा कमडलु देहूउपचारा जाणवितो वारा अवसरू
निसर्ग प्रतीकांचा भावगीतात सहज आधार घेतला आहे.
रात्र काळी घागर काळी, यमुना जळे हीकाळे की माय
बुंथ काळी बिलवर काळी,गळा मोती एकावली काळी वो माय
मी काळी, काचळी काळी, कासकासिली ते काळी वो माय
एकली पाणिया नवजाय साजणी सवे पाठवा मूर्ती सावळी वो माय.

भावस्थिती आणि रंगाच्या भूमिकेवर आधारित कारुण्यात्मक प्रतिमाने रेखाटलेली मनोहरी चित्र नामदेवांनी रेखाटलेले. रात्रीचा अंधारही पूर्णपणे नाहीसा झाला नसतानाही गोपिकांना गडद काळाकुट्ट अंधारात प्रत्येक वस्तू तिला काळी भासते, अलंकार, कंचुकी, वस्त्र व यमुनाजळही काळे या काळेपणामध्ये तीला कृष्णरूप भरलेले दिसते. माधुर्य, प्रसादिकता, संगीतात्मकता रंग युक्त रचलेली हे अभंग मराठी काव्याला कलात्मकता प्रदान करतात.

भा.रा.तांबे :-

तिन्ही सांजा सखे, मिळाल्या देई वचन तुला
आजपासून जीवे अधिक तू माझ्या जीवाला.

या भावना व्यक्त करतांना कवितेत ‘त्रिलोकगामी मारुत’ येतो, वर्णनपर निसर्ग तपशिलाने कविमनातील भावना समांतरपणे व्यक्त होत राहते.

नामदेव:- (२५१)

मल्हार महुडे गगनी दाटले विजू खळे गर्जीन्नले
या निसर्ग तपशीलातून जिव लागला गोपाळे'
ही अनुभूती संपन्न होत जाते.
गोविंद पहाया लौकरी, कैसे विरु वरूषता हे मधूधारी गे माये
आनंद मयुरे नाचती आपैसे
प्रेमी निळकंठ झालेत तैसे गे माये।
आनंद मयूरे नाचती आपैसे
प्रेमी निळकंठ झालेत तैसे गे माये।

कवी कुशलशब्द शिल्पी सारण्या सुंदर सांकेतिक भाषेमध्ये आपल्या भावना व्यक्त करतात. लताकुंजीमध्ये मिळणारी, क्रीडा करणारे बालकृष्णाच मोहक रूप बघावयास आकाश एकत्रित झाले. विजा कडाडू लागल्या वर्षाधारा वर्षु लागल्या अत्यानंदाने मोर मृत्य करू लागले. आपल्या आराध्याच्या मोहक रुपाची सुधा प्राशन करून मेघ कृष्णवर्ण झाले. इ. भावनांचे प्रकटीकरण यातून झाले ते कवीच्या प्रतिभा संपन्न व्यक्तित्वाचा परिचय घडवत.

**ड)** सादरीकरणासाठी एखादी भावस्थिती निवडलेली असते. त्यासाठी काही वेळा आत्ममग्नता स्वीकारली जाते. आदीगीतापासून विलापिकांपर्यंत, प्रेमगीतापासून भक्तीपरिपूर्ण भावनांपर्यंत, अद्वैत एक्यापर्यंत, आत्ममग्नता भावगीतांना आशयघन करतात.

माझिये जननी हरणी। गुंतलीसे कवने वनी
मुके तुझे मी पाडस । चुकले माये पाहे त्यास
चुकली माझिये हरिणी । फिरतसे रानोवानी
आता भेटवा जननी । विनवितसे दासी जनी (३९)
माझी आंधळ्याची काठी।अडकली कवणे बेटी
आता सांगू मी कवणासी।धाव पापे हृषीकेशी
तुज वाचुनी विठ्ठला। कोणी नाही रे मजला
माथा ठेवी तुझे चरणी। म्हणे नामयाची जनी (१७३१)

भक्तीभावाने परिपूर्ण,रसाद्र्ता व भावार्द्रतेचा स्वाभाविक अविष्कार त्यांच्या काण्यात आहे. जनाबाई चे संपूर्ण काव्य स्वानुभूतीवर रचते उत्कटता आर्तता असल्यामुळे त्याला उत्कृष्ट रूप प्राप्त झाले.

आधुनिक काव्यामध्ये शांता शेळके, कुसुमाग्रज, केशवसुत यांच्या काव्याचा इथे उल्लेख करावा लागेल.

जिवलगा राहिले, दूर घर माझे
पाउल थकले, माथ्यावरचे जड झाले ओझे !
गर्जा जयजयकार क्रांतीचा.........
कशाचा आई, भिजविसी डोळे? उजळ तुझे भाल
रात्रीच्या अंधारात असे उद्याचा उष:काल

सरणावरती आज अमुची पेटता प्रेते
उठतील त्या ज्वालामधुनी भावी क्रांतीचे नेते.
लोहदंड तव पायामधले खळखळा तुटणार, आई खळ खळा तुटणार

इथे समाजमनाशी एकारलेली भावस्थिती आहे. हे समूहभान व्यक्तकरताना एकतर्फी संवाद आहे. यामध्ये राष्ट्रभक्तीपर गीते, जनजागरण करणारी भावगीते येतात. त्यातही सामाजिक उच्चारव असतो. सामुहिक मन एकत्रितपणे व्यक्त होते. समूहस्वर असणारी भावगीते अधिक लोकप्रिय होतात. ती त्यातील ‘स्वरसंदर्भा’ मुळे एक गतीलय त्याला प्राप्त होते. सामूहिक उच्चरव त्यात असतो.

‘स्वतंत्रते भगवती त्वामहम्  यशोयुतावंदे.......’
जिकडे जावे तिकडे माझी भावंडे दिसतातहेत
सर्वत्र खुणा मला माझ्या घरच्या दिसतातहेत
ब्राह्मण नाही हिंदू नाही ही न मी एक पंथाचा
तेच पतित की जे आखडीती प्रदेश साकल्याचा
त्रिभुवन उदळित प्रभाकर......... काठोकाठ कटाह भरत
नव्या मनूतील नव्या दमाचा शूर शिपाई आहे.

भावगीतात गतीसंवेद लय, चाल येते. ज्यामुळे दृश्यप्रायता भरीव होते. सादरीकरणात यशस्वी ठरलेल्या भावगीतात आशय आणि अभिव्यक्ती भावकाव्याप्रमाणे अभेध असते.

अचपळ मन माझे नावरे आवरता
तुझ्यावीण क्षीण होतो धाव रे धाव आता

खडखडीत व रोखठोक विसरून थेट भावना व्यक्त करताना ‘अचपळमन’ यातून भावपूर्ण आशय गतीसंवेद करीत तीव्रतेने मांडतात.

कन्या सासुराशी जाये, मागे वळुनीया पाहे
तैसे झाले माझे जीवा, केव्हा भेटसी केशवा
जीवना वेगळी मासोळी, तैसा तुका तळमळी.

तुकोबा आपली तडफड, आर्तता ‘तळमळी’ यातून असह्य अशी अगतिकता गतीसंवेद करीत मांडतात.

या सर्व घटकांचा विचार केला तर लक्षात येते की भावगीत भावकविताच बनलेली असते. म्हणूनच भावगीताला दीर्घकाळ अस्तित्व लाभलेले ते यामुळे मनःपटलावर प्रतिबिंबित झालेल्या भावना अनावरपणे व्यक्त होतांना आशय व शब्दकळा यांचा एक अनोखा संमिश्र त्यापेक्षा व्यामिश्र असा पट तयार करतात आणि मराठी भावगीतात तो झाला आहे. म्हणूनच आदीकालापासून चालत आलेली भावगीते स्वतंत्र काव्यप्रकार आहे. स्वतंत्र असला तरी स्वयंभू नाही. आदिकविता, लोकगीते, संतकविता इत्यादी सुनीतांची आधुनिक कवितातंत्राने भारलेली भावकविता रविकिरण मंडळाची प्रयोगशील कविता आकाशवाणी, चित्रपट यांच्या गरजेतून निर्माण झालेली

कविता, काव्यमैफिल, गीतमैफिल यात सादर होणारी अशा अनेक काव्यगीत प्रकारच्या सरमिसळीतून भावगीत उभे राहिले आहे.

भावगीतांची परंपरा समृद्ध करण्यामध्ये ना.घ.देशपांडे, बा.भ.बोरकर, भा.रा.तांबे, अनंत काणेटकर, कुसुमाग्रज, राजा बढे, सावळाराम, शांता शेळके, ग.दि.मा. ज्ञानेश्वर, नामदेव, बहिणाबाई, व. बापट, मंगेश पाडगावकर, विंदा, बालकवी, बी, अनिल, मुक्तिबोध, इंदिरा संत.

आज मात्र ही जागतिकीकरणाच्या विलक्षण रेत्र्याट भाव आणि गीत यांची फारकत होऊन फक्त 'वाद्यमेळ आणि स्वरबंध' यांचे आघाती परिणाम हा ठेका स्वरायला लावला तरी तो संगीत तर नाही पण भावगीत त्यातही नाही.

खंत याची वाटते की चित्रवाणी माध्यमातून हिणकसपण शिरकाव करू पहात आहे. आणि या प्रवाहात चांगले ताकदीचे कवी देखील वाहत जात असल्याचे चित्र उमटत आहे. नवी पिढी यांना संगीत 'क्षणजीवी' असणारे आवडते त्यांना भावगीत नकोसे झाले आहे.

वरील विवेचना मधून खालील निष्कर्ष निघतात.

## निष्कर्ष:

1) तरंगकाव्य, लहरीकाव्य कविगीत, गीती, भावगीतिका असे वेगवेगळे नामकरण होत होत शेवटी भावगीत शब्द लिरिक ला प्रतिशब्द म्हणून झाला.

2) भावगीतात गीतभान असतेच उच्चारणाला निश्चित ताल,लय देणारी जातिवृत्ते असतात व ती 'कानसेन' समोर ठेवून अवतरलेले असते.

3) भावगीतात कंठगत स्वरांना न्याय असतो स्वरांना न्याय देणारी शब्दकळा भावगीतात असते म्हणून भावगीत आत सादरीकरण असते.

4) भावगीतात अनेक भाषिक चिन्हांपैकी प्रश्नचिन्ह, विरामचिन्हानाच स्थान मिळते. या चिन्हामुळे आशय सादर होण्यास अधिक चित्रमयता येते.

5) भावगीत स्वतंत्र काव्यप्रकार मानला तरी तो स्वयंभू नाही.

## संदर्भ:


- आधुनिक मराठी हिंदी गीति काव्य- डॉ. शोभा भागडे.
- सकत संत गाथा रा.ची. ढेरे- (ज्ञानेश्वर महा. अभंग)
- सकत संत गाथा रा.ची. ढेरे- (नामदेव महा. अभंग)
- सकत संत गाथा रा.ची. ढेरे- (जनाबाईचे अभंग)
- मराठी कविता परंपरा आणि दर्शन -संपादक डॉ.रवींद्र शोभणे.
- वीणाकाव्य - रामकृष्ण बाळकृष्ण कीर्तिकर, विविध ज्ञानविस्तार नोव्हेंबर १९२१.
- गीतिकाव्य - संपादक वसंत दावतर.
- भावगीत - काव्यविचार रविकिरण मंडळ १९२४.
- मुक्त आणि भावगीत – मधुपर्क - पु.मं.लाड १९४५.
- गीतभान - रमेश तेंडुलकर.

- बी.कवी : चरित्र व काव्य चर्चा ले.सौ. निर्मला कणेकर श्री लेखन वाचन भांडार, ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे 30 **Gen-**5431.